

REIKI VIDYA NIKETAN

सर्वे: सन्तु निरामया:

# रेकि ब्रह्म

वर्ष ८वे अंक १०वा । जुलै २०२०

**अध्यात्म...**

स्वत्त्वाला मोक्षाचे मार्ग दाखवून मुक्त करते,
जीवनातील कर्तव्यांची पुर्तताही तेचं शिकवते.




संपादकिय

# अध्यात्म आणि संसार यांच्यातील संघर्ष..

सामान्यतः असे मानले जाते कि माणसाने आपला संसारातील रस आणि आपली भूमिका संपली कि अध्यात्माच्या डोहात उतरायचे. बरीचशी माणसे तर संसारात डुंबुन राहत असताना अध्यात्माकडे बघणे सुद्धा टाळतात एवढी त्यांना अध्यात्माची भीति वाटते. अध्यात्मात गेलेला माणुस संसाराला नालायक ठरतो असा काहीतरी सिद्धांत लोक काढतात आणि यामागे काय तर्कशास्त्र आहे हे मात्र मला कधीच कळत नाही.

तसे पाहता ही– अध्यात्म आणि संसार– वेगळी नाहीतच. फक्त आपल्याच मनाने तो एक भेदभाव तयार केलेला आहे. ही दोघांमधली भिंत फक्त आपल्या मनाने घातलेली आहे आणि ती तोडायला मनाचाच खंबिरपणा आणि समज गरजेची आहे. जसे एखादे मुल शाळेत जाते. का जाते, तर आपल्या स्वतःला ज्ञान आणि अनुभवांनी समृद्ध करायला. पण शाळेत त्याला कोणत्या गोष्टींचे ज्ञान दिले जाते? तर भौतिक गोष्टींचे. भूगोल, इतिहास, नागरिकशास्त्र, गणित, पदार्थ विज्ञान, रसायनिक विज्ञान इत्यादि. पण ही तर आपल्या जीवनाची बाह्य अंगे झाली. केवळ बाह्य अंगांनी माणसाला कसे काय जगता येणार. ह्या सगळ्या बाह्यांगांच्या मागे ज्या गोष्टी आहेत त्या तर अंतरंगात आहेत. मग त्या कल्पना असोत, विचार असोत, भावना असोत. ह्या सगळ्या गोष्टींशिवाय त्याला सांसारिक कर्मे कशी करता येणार. जसे शाळेत बाह्यांग व्यवस्थापन शिकवले जाते तसेच अध्यात्मात अंतरंगाचे व्यवस्थापन शिकवले जाते. हे दोन्ही सांभाळले गेले तरा आणि तरच माणुस एक संतुलित अस्तित्व म्हणून ह्या जगात जगू शकतो. आजच्या अस्वस्थतेचे कारण ही मानवाची असंतुलित अवस्था तर नसेल ना?

आपण जर अध्यात्माचा सखोल अभ्यास केला, साऱ्या पंथांचा, संप्रदायांच्या शिकवणुकीचा अभ्यास केला तर लक्षात येईल कि कोणत्याही गुरूदेवांनी कोठल्याही शिष्याला कधीही संसार सोडून आपल्यामागे येण्याचा उपदेश केलेला नाही. मग ते श्री गुरूचरित्रातील धौम्य ऋषि असोत, नाहीतर प्रत्यक्ष श्री नृसिंह सरस्वति असोत. धौम्य ऋषिंनी आपल्या तीनही शिष्यांना बारा वर्षांच्या तपस्येनंतर ज्ञानदान करून उपदेश केला कि आता सुखाने घरी जाऊन जबाबदारीने चांगला संसार करा. अगदी श्री गुरू (नृसिंह सरस्वति) यांनी सुद्धा आपला लाडका शिष्य सायंदेव याला सांगितले कि आता माझ्या आशिर्वादाने चांगला संसार कर आणि मग सगळे स्थिर–स्थावर झाले कि माझ्याकडे परत ये. त्यांना ऋषिंनी किंवा गुरूंनी हे नाही सांगितले कि सगळा संसार, घरदार सोडून माझ्याकडे या आणि माझी सेवा करा. आपल्या शिष्याला सकारात्मकतेची शिकवण देऊन त्या सकारात्मकतेला साऱ्या समाजात रूजवून एक चांगला समाज तयार करायचा हीच साऱ्या गुरुदेवांची आस असते हे समाजाला का कळत नाही? माझ्या मुलाला किंवा मुलीला एक शांतचित्ताची बैठक देऊन त्यावर त्याने किंवा तिने छान आयुष्य जगावे असे का वाटत नाही आताच्या मातापित्यांना? कोठेतरी ह्या दोन गोष्टी एकमेकांना पूरक असताना त्या एक दुसऱ्याला मारक आहेत असा आभास समाजात का तयार केला जातोय. अध्यात्म आणि सांसारिक जीवन यांचा ताळमेळ करत जगणारा भारतिय समाज सगळ्या जगाला वंदनिय होता जो ब्रिटीशांनी आपल्या स्वार्थापायी भौतिक शिक्षणाची कास आपणाला धरायला लावली आणि भारताचा ह्रास सुरू झाला हे आपल्या डोळ्यांदेखत घडले असताना आपण पुन्हा एकदा त्या दिव्य विचाराला सामोरे का जाऊ नये? माझे लाडके मूल भ्रष्टाचारात लडबडलेला अभियंता किंवा डॉक्टर होण्यापेक्षा एक आदर्श नागरिक बनावा असे स्वप्न आता पालकांना कधी पडणार याचीच प्रतिक्षा आता आपल्याला करायला हवी कारण त्या स्वप्नातूनच उद्याचे सत्ययुगाचे पहिले पाऊल पडणार आहे हे निश्चित.

**अजित सर**
दि. १२ जून २०२०



# गुरूचरित्र

## मला समजले तसे

## भक्तीकांड अध्याय ५२वा

श्री प्रविण कुळकर्णी, ठाणे

मागील अध्यायात आपण श्रीगुरु दत्तात्रयांचा द्वितीय अवतार– नृसिंहसरस्वती– यांचा लौकीकार्थाने निजानंदगमनाचा सोहळा व त्यांनी सदभक्तांना कळकळीने केलेले प्रेमाचे आवाहनपाहिले. गंगाधर सरस्वती विरचित ५१ अध्यायी श्रीगुरुचरित्र खरेतर इथेच संपन्न झाले असा उल्लेख श्री. रामचंद्र कृष्ण कामत यानी ५२ व्या अध्यायाच्या सुरवातीला तळटीपेत केला आहे. ५२ वा अवतरणिका अध्याय म्हणजे शके १७९६ मध्ये निर्णयसागर छापखान्यात श्री. जनार्दन महादेव गुर्जर यांनी छापलेले शतश्लोकी गुरुचरित्र नावाचे पुस्तक आहे असे त्यांनी म्हंटले आहे. ५१ अध्यायांचे संक्षेपाने केलेले अध्यायवार सार संकलन म्हणजे अवतरणिका तेच आपण इथे पहाणार आहोत.

श्रीगुरुदेव दत्तात्रयांच्या चरणकमळांना साष्टांग नमस्कार. रजोगुणाने सृष्टी उत्पन्न करणारे ब्रह्मदेव, सत्वगुणाने सृष्टीचे पालनपोषण करणारे व सर्वांच्या अणुरेणूत अंतर्बाह्य व्यापून असणारे श्रीविष्णु व तमोगुणाने सृष्टीचा लय करणारे महेश या तिघांच्या मागे जे अस्तित्वरुपाने स्थित आहे त्या अद्वय व एकमेव परब्रह्माला माझा नमस्कार. गुरुचरित्र ऐकून ब्रह्मानंदी निमग्न झालेल्या नामधारकाचे अंग घामाने भिजले होते, अंगावर रोमांच उभे राहिले होते, डोळ्यातून आनंदाश्रु वहात होते, त्यांच्यात सात्विक अष्टभाव उत्पन्न झाले होते. सिध्द सरस्वती त्यांना कुरवाळतात. प्रेमाने आलिंगन देतात. व सांगतात तू या संसार सागरात तरलास. असाच जर समाधिस्थ राहिलास तर हे ज्ञान लोकांपर्यंत कोण पोहोचवणार? याकरता श्रीगुरुचरणावर निष्ठा ठेऊन, तू शास्त्राधारे या जगात बाह्यव्यवहार कर. तू विचारलेल्या प्रश्नांमुळे, तीन प्रकारच्या तापांचे–अध्यात्मिक, अधिदैविक व अधिभौतिक– निवारण करणाऱ्या श्रीगुरुचरित्रामृताचे कथन करण्याची मला स्फूर्ती झाली. तु ही ते एकाग्रतेने ऐकलेस. आता याचा समाजासाठी लोकोपकारक असा प्रसार कर. हे ऐकल्यावर नामधारक डोळे उघडतो, व सिध्दांचे पाय पकडून त्यांना ५१ अध्यायांचे संक्षेप सार – त्रैलोक्य चिंतामणी रसायन– सांगायला विनंती करतो. असा हा अध्यायवार सारांश.

१.मंगलाचरणाचा अध्याय व मुख्य देवतांचे स्मरण करून गंगाधर सरस्वती, प्रस्तुत ग्रंथलेखक, श्रीगुरुदर्शनासाठी अत्यंतिकतेने तळमळणाऱ्या नामधारक नावाच्या भक्तालाश्रीगुरुमूर्तीचे दर्शन होते याची कथा सांगत आहे.२. दुसऱ्यात नामधारकाला श्रीगुरु नृसिंहसरस्वतींचा पट्टशिष्य सिध्द सरस्वती, जो त्यांच्या समवेत सदैव होता, त्याच्या भेटीचा वृत्तांत, व त्यांनी कथन केलेल्या श्रीगुरुचरित्रात ब्रह्मदेवाची उत्पत्ती, चार युगांचे स्वभाव, व दीपक शिष्याने

केलेल्या गुरुशुश्रुषेचे वर्णन आहे.३. सिध्द सरस्वती नामधारकाला अमरजासंगमावर आपल्या घरी नेतात, व दुर्वास ऋषीनी अंबरीष राजाला दिलेल्या शापाचे निवारण करण्यासाठी वआपल्या भक्ताला वाचवण्यासाठी श्रीविष्णु नारायण दशावतार घेतात त्याची गोष्ट तिसऱ्या अध्यायात आहे. ४. चौथ्यात अनुसूया सतीचा पातिव्रत्य भंग करण्यासाठी आलेले ब्रह्माविष्णुमहेश तिचेच पुत्र होतात, थोडक्यात आद्य श्रीदत्तात्रयांच्या प्रगटनाची कथा यात आहे. ५. पाचव्यात, श्रीदत्तात्रयांचा प्रथम अवतार पीठापुरी श्रीपाद श्रीवल्लभ या नावाने होतो. व ते तीर्थयात्रेला निघतात याची कथा आहे. ६. सहाव्यात, श्रीपाद श्रीवल्लभ गोकर्णाला का येतात व गोकर्ण तीर्थाला कशामुळे महत्व प्राप्त झाले, याची कथा यात आहे. रावण शिवाचे प्राणलिंग घेऊन निघाला असताना गणपती त्यात विघ्न आणतो, व ते गोकर्ण क्षेत्री प्रस्थापित करतो. ७. सातव्यात, गोकर्ण महिमा सांगितला आहे. एका चांडाळणीचा उध्दार शिवरात्रीच्या दिवशी गोकर्णाला बिल्वपत्र वाहिल्यामुळे कसा होतो त्याची कथा. ८. आठव्यात, पुत्राच्या मंदबुध्दीला कंटाळून जीव द्यायला निघालेल्या मातापुत्राला श्रीपाद श्रीवल्लभ शनीप्रदोष व्रताची कथा सांगून त्या पुत्राला ज्ञानी करतात ती कथा. ९. नवव्यात, एका परीटाच्या भक्तीवर प्रसन्न होऊन श्रीपाद श्रीवल्लभ, त्याची वासना तृप्ती करण्याकरता त्याला पुढील जन्मी राज्यपद व ज्ञान मिळेल असा वर देतात त्याची कथा. १०.दहाव्यात, पीठापुर श्रीपाद श्रीवल्लभ महिमा कथन– संकल्पपुर्ती करण्याकरीता पीठापुरी निघालेल्या भक्ताची चार चोर हत्या करतात, त्या चोरांचा वध व भक्ताला प्राणदान याची कथा. ११. अकराव्यात, श्रीनृसिंहसरस्वतींच्या अवताराची– श्रीदत्तात्रयांचा द्वितीय अवतार– कथा यात आहे. कारंजे गावात माधव व अंबा यांच्या पोटी श्रीगुरु जन्म घेतात व जन्मत:च ॐ कार उच्चारण करतात. १२. मातेला ज्ञान देऊन श्रीगुरु संन्यास ग्रहणासाठी तीर्थयात्रेला जातात, व काशीक्षेत्री कृष्णसरस्वती यांना गुरु करून संन्यासग्रहण करतात. पुढे ते उत्तरेला यात्रेवर जातात याची कथा बाराव्यात आहे. १३.तेराव्यात, श्रीगुरु माता पित्याचे दर्शन घेतात व पोटशूळाची व्याधी असणाऱ्या ब्राम्हणाचे व्याधी निरसन करतात याची कथा. १४. सायंदेवास वरदान व क्रुर यवनाला शासन याची गोष्ट चौदाव्यात आहे.१५. पंधराव्यात, शिष्यांना तीर्थमहिमा कथन व वेगवेगळ्या तीर्थांचे वर्णन. शिष्यांना तीर्थयात्रेला पाठवून स्वत: वैजनाथ येथे श्रीगुरु गुप्तरुपाने वावरतात याची कथा. १६. चंचल स्वभावाच्या व गुरुनिंदा करणाऱ्या ब्राह्मणाला गुरुभक्ती म्हणजे काय? ती कशी करावी? याचे ज्ञान देऊन त्याची पश्चात्तापदग्धता बघून त्याला ज्ञानी करतात. तेथून ते भुवनेश्वरी देवीजवळ भिल्लवाडीला आले याची कथा सोळाव्यात. १७.सतराव्यात, मंदमती ब्राह्मण भूवनेश्वरी देवीला आपली जीभ कापून अर्पण करतो, त्यास




श्रीगुरु ज्ञानी करतात त्याची कथा. १८.अठराव्यात, दरिद्री ब्राह्मण दांपत्याच्या घरचा, त्यांना उदरनिर्वाहासाठी उपयुक्त असणाऱ्या घेवड्याच्या वेलाला कापून, श्रीगुरु त्यांना सुवर्ण मोहरांनी भरलेला हंडा प्रदान करतात त्याची कथा. १९. एकोणीसाव्यात, चौसष्ठ योगीनींना दर्शन व वरदान व औदूंबर वृक्ष महिमा कथन, व गाणगापुरी श्रीगुरुंचे आगमन याची कथा. २०. संमंध बाधेमुळे एका स्त्रीची संतती मरण पावत होती, श्रीगुरु, ती संमंध बाधा दूर करून तिला दोन अपत्यांची प्राप्ती करून देतात व त्यातील छोट्या बालकाच्या अकाली मरणानंतर तिला सिध्द रुपात येऊन ज्ञानामृत पाजतात त्याची कथा विसाव्यात. २१. मागील अध्यायातील मृत बालकाला औंदूबरापाशी परत प्राणदान देतात त्याची कथा एकविसाव्यात. २२. दरिद्री ब्राह्मणाच्या घरी भिक्षेला गेले असता त्यांच्या घरच्या वांझ व वृध्द म्हशीला दुग्धवती करतात त्याची कथा बावीसाव्यात. २३. गाणगापुरचा राजा, कायम वास्तव्यासाठी, श्रीगुरुंना वाजत गाजत गाणगापूर गावात नेत असताना वाटेत एका ब्रह्मराक्षसाचा उध्दार, तसेच, त्रिविक्रम यती श्रीगुरुंची निंदा करतो, त्याची कथा तेवीसाव्यात. २४.त्रिविक्रमाच्या भेटीला, श्रीगुरु कुमसी गावी जातात, त्याला विश्वरुप दर्शन देऊन त्याच्या अहंकाराचे खंडन त्याची कथा चोविसाव्यात. ज्ञानकांड समाप्त. २५, म्लेंछ राजापुढे वेद म्हणणारे मदांध व गर्वोन्मत्त ब्राह्मणद्वय,

त्रिविक्रमाला त्रास देतात त्यांचा गर्वखंडन करण्याकरता त्रिविक्रम यती त्यांना गाणगापूरला श्रीगुरुंच्याकडे घेऊन येतो, त्याची कथा पंचविसाव्यात. २६.सव्विसाव्यात, श्रीगुरु त्या अहंकारी ब्राह्मणांना चारही वेदांची वेदरचना सांगतात व त्यांना वेदांवरती वाद घालू नका असे परोपरीने सांगतात त्याची कथा. २७. ते उन्मत्त ब्राह्मण ऐकत नाहीत हे बघून, श्रीगुरु, एका पतिताला भस्म लावून ज्ञानी करतात व त्या विप्रांसमवेत वेदांवर वादविवाद करण्यास लावतात, मती कूंठीत झालेले ब्राह्मण श्रीगुरुंच्या शापाचे धनी होऊन ब्रह्मराक्षस होतात त्याची कथा सत्ताविसाव्यात आली आहे. २८.ज्ञानी झालेल्या पतिताला उच्चावस्था प्राप्त होते, त्याला धर्म काय व अधर्म काय हे सांगून, त्याच्या अंगाच्या विभूतीचे स्नपन करून त्याला परत पतितावस्था देऊन घरी परत पाठवतात त्याची कथा अठ्ठाविसाव्यात आली आहे. २९.एकोणतिसाव्यात, त्रिविक्रमाला भस्ममहिमा कथन व एका राक्षसाचा, वामदेव महायोगी, विभुती लाऊन उध्दार करतात त्याची कथा. ३०.तिसाव्यात, एका ब्राह्मणस्त्रीचा पती मरण पावल्यानंतर, तिचे सांत्वन करण्याकरता, श्रीगुरु, सिध्दाचे रुप घेऊन, नाना कथा सांगून तिला शांत करतात त्याची कथा. ३१.एकतिसाव्यात, सिध्दरुपाने आलेले श्रीगुरु, तिला पतिव्रता धर्म व सती जाण्याची रीत व शास्त्रार्थ सांगतात.३२. विधवेचे धर्म व सती धर्म सांगून झाल्यावर ती स्त्री, सती जाण्याचा मार्ग स्विकारते, तिचा निर्धार व श्रीगुरुंवरील श्रध्दा बघून, ती स्त्री जेंव्हा सहगमनापुर्वी श्रीगुरुंचे दर्शन घेण्यास येते, तेंव्हा तिच्या पतिच्या शरीरावर श्रीगुरुचरण रुद्र अभिषेक जल स्नपन करून त्या पतीला पुढील आयुष्यातील ३० वर्षे या आयुष्यात प्रदान करून प्राणदान देतात व वर देतातत्याची कथा बत्तीसाव्यात आहे. ३३. पराशर ऋषी रुद्राक्षधारण कथा, कुक्कूट मर्कट कथा, तसेच, वैश्य वेश्येची कथा राजाला तेहेतिसाव्यात सांगतात. ३४. पराशर ऋषी रुद्राध्याय महिमा कथन करतात व राजपुत्राचे प्राण वाचवण्यासाठी दहा सहस्त्र वेळेलारुद्रपठण केलेल्या अभिषेक जलाने राजपुत्राला स्नान घालायचा उपाय सांगतात व राजा त्याची पुर्तता करून मूर्छित झालेल्या राजपुत्राला संजीवन करतो व त्याला दहा सहस्त्र वर्षे आयुष्य प्राप्त होते त्याची कथाचौतीसाव्यात आली आहे. ३५. पस्तिसाव्यात, श्रीगुरु, ब्राह्मण दांपत्याला, कच–देवयानी कथा, सिमंतिनीला दिलेल्या सोमवार व्रताची कथा सांगतात. ३६. ब्राह्मणांचे आचार धर्म, गायत्री मंत्र जप व अनुष्ठानविधी याचे विस्तृत वर्णन छत्तिसाव्यात आले आहे. ३७.देवांचा षोडशोपचार पूजाविधी, व ब्रह्मकर्म– भोजन, शयनादि विधी यांचे वर्णन सदतिसाव्यात आले आहे. कर्मकांड समाप्त. ३८. भास्कर ब्राह्मण तिघांना पुरेल एव्हढ्या शिध्यातून शिजवलेल्या अन्नातून श्रीगुरुकृपेने चार सहस्त्र लोकांना जेवण घालतो, हयाअन्नपुर्णा अवताराची लीलाश्रीगुरु अडतिसाव्यात दाखवतात. ३९. सोमनाथ ब्राह्मणाच्या पत्नीलासाठाव्या वर्षी वंध्यत्व आलेले असताना पुत्रसंतती होते, त्याची कथा व अश्वत्थ महिमा वर्णन एकोणचाळिसाव्यात आले आहे. ४०.श्रध्दा व भक्तीने केलेले शुष्क काष्ठ्पुजन नरहरीचे कुष्ठनिवारण व सुवर्णयुक्त कांती प्रदान करते तसेच, शबर शिष्याची कथा व नरहरी कवी होऊन श्रीगुरुंचा निस्सीम भक्त होतोयाची कथा चाळीसाव्यात आली आहे. ४१. सायंदेव गुरुसेवाविधान, काशीक्षेत्रयात्रा विधी व फळ निरुपण, सायंदेवाची काशीक्षेत्रयात्रा व त्याला व त्याच्या कुटूंबियाना वरप्रदानयाची कथा एक्केचाळीसाव्यात आली आहे. ४२. सायंदेवाला अनंतव्रत महिमा कथन व त्याच्याहातून अनंत व्रताचे अनुष्ठान याची कथा बेचाळीसाव्यात आहे. ४३. नितांत श्रध्दा असणाऱ्या कापड विणणाऱ्या कोष्ट्याला (तंतिक) क्षणार्धात श्रीशैल्य पर्वतावर नेऊन श्रीमल्लीकार्जुनाची पुजा करावयाचे सदभाग्य प्रदान केल्याची व विमर्षण राजाची श्रीशैल्यपर्वत प्रदक्षिणा फळाची महती सांगणारा त्रेचाळीसावा अध्याय आहे. ४४. तुळजापूराहून आलेल्या कुष्ठी ब्राह्मणाला श्रीगुरु संगमात स्नान करवून सुवर्णकांती व ज्ञान प्रदान करतात त्याची कथा चव्वेचाळीसाव्यात आहे. ४५. कल्लेश्वर भक्त नरहरीला, कल्लेश्वर पिंडाच्या जागी श्रीगुरुंचे दर्शन होते व तो श्रीगुरुंचा कट्टर भक्त व कवी होतो याची कथा पंचेचाळीसाव्यात आली आहे. ४६. दिवाळीच्या दिवशी सात शिष्यांकडे व मठात अशी एकाच वेळी आठ रुपे घेऊन श्रीगुरु सर्वव्यापी परमात्मस्वरुप आहेत हे दाखवून देणारी कथा सेहेचाळीसाव्यात आली आहे. ४७. गुरुवचनांवर अत्यंत श्रध्दा ठेवणारा शुद्र शेतकरी गुरुंच्या सल्ल्यानुसार तयार न झालेले आपले जोंधळयाचे शेत कापून टाकतो व पुढे शतपट नफा कमावतो. ही कथा सत्तेचाळीसाव्यात आली आहे. ४८. अमरजा संगम माहात्म्य व गाणगापूर अष्टतीर्थ महिमा, रत्नाबाईचे कुष्ठ निवारण यांची कथा अठ्ठेचाळीसाव्यात आली आहे. ४९. ईश्वर– पार्वती संवाद, गुरुगीता अध्याय एकुणपन्नासाव्यात आहे. ५०. पुर्वजन्मीच्या रजकाचा म्लेंछ राजा म्हणून जन्म, म्लेंछ राजाचे व्याधी निराकरण, त्याच्या राजवैभवाचे निरीक्षण व वरप्रदान, व त्याला ज्ञानप्राप्तीसाठी श्रीशैल्यावर येण्याचे कथन याची कथा पन्नासाव्यात आली आहे.५१. या पृथ्वीवरील पापप्रवृत्ती बघून गुप्तरुपाने रहाण्याचा मानस व मल्लीकार्जुन यात्रेस निजानंदगमन करण्याचा संकल्प, शिष्यांना केवळ माझ्या स्मरणात, कीर्तनात व भजनात आसक्ती धरून मठात रहा असा उपदेश करून निजानंदी गमन व लौकीकार्थाने अवतार समाप्त करतात याची कथा एक्कावनाव्या अध्यायी आली आहे.भक्तीकांड समाप्त.

सिध्द सांगतात श्रीगुरु गेले नाहीत, ते गुप्तरुपाने गाणगापूरी नित्य वास करून आहेत. जो जप करतो, त्याला ते भेटतात. जसा भावार्थ तशी कार्यसिध्दी. ही अवतरणिका जे वाचतील, त्या गुरुचरित्र वाचकांना तात्काळ श्रीगुरुचरित्रातील लिलांची स्मृती होईल. ज्यांनी गुरुचरित्र वाचलेले नाही, त्यांना गुरुचरित्र वाचनाची/ श्रवणाची इच्छा होईल. ज्यांचे अंत:करण पवित्र आहे, त्यांनी हे गुरुचरित्र सदा सर्वकाळ वाचावे. त्यामुळे भुलोकी सुख प्राप्ती होईल.

गुरुचरित्र सप्ताह करण्याची पध्दत– चांगला दिवस बघून, शुचिर्भूत होऊन, रांगोळी काढून जागा सुशोभीत करावी. एका आसनावर श्रीगुरुचरित्र ठेऊन गुरुचरित्र पोथीचे पुजन करावे. ब्राह्मण पूजन करून शुभ्र कंबळासनावर एका स्थानी बसून ठरलेल्या वेळी पठण करावे.अनावश्यक बोलु नये. एरव्ही मौन धरावे. ब्रह्मचर्यादि नियम पाळावे, वाचतांना तुपाचा दीवा लावावा. देव, वडीलधारी व गुरुंना नमस्कार करून पूर्वेकडे तोंड करून वाचन करावे. प्रथम दिवशी सात, दुसऱ्या दिवशी अठरा, तिसऱ्या दिवशी अठ्ठावीस, चौथ्या दिवशी चौतीस, पाचव्या दिवशी सदोतीस पर्यंत, सहाव्या दिवशी त्रेचाळीस व सातव्या दिवशी एक्कावन्न व अवतरणिका वाचावी. नित्य पाठ झाल्यावर उत्तरांग पुजन, श्रीगुरु नमन करून फलाहार करावा. रात्री भूमीशयन करावे. याप्रकारे सात दिवस करावे. समाप्तीला ब्राह्मण दांपत्याला भोजन व दान दक्षिणा द्यावी.

सिध्दांच्या अमृतानुभवाच्या खाणीतून नामधारक एकेक अध्यायरुपी रत्ने आणत होता. या एक्कावन्न रत्नांचा रांजण देऊन त्यांनी भक्तांना व याचकांना संतुष्ट केले आहे. प्रति अध्याय एक रत्नस्वरुप ओवी ओवून ओवलेली ही अवतरणिका आहे. सिध्दस्वरुपी मेघाने, नामधारक चातकाच्या केवळ एक बिंदु टिपण्यासाठी उघडलेल्या मुखात, अमृताचा अपार वर्षाव केला आहे. त्यामुळे भक्तांना तसेच अभक्तांना सुध्दा फुकट अमर्याद लाभ मिळाला आहे. श्रीगुरुस्वरुपात्मक नारायणा! तू दीनांचा कैवारी आहेस, तू आपल्या खुणा दाखविण्यासाठी ही गुरुशिष्यांची रुपे घेऊन खेळचालविला आहेस. असा हा ५१ अध्यायातून सारभूत असलेला अवतरणिका अध्याय समाप्त.श्रीगुरुदत्तात्रयांना साष्टांग नमस्कार. श्रीगुरुदेवदत्त. ॥ इति श्रीगुरुचरित्र संपूर्णम॥ श्री अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त ॥

परमपूज्य श्री. अजित सरांच्या कृपाशिर्वादामुळे श्रीगुरुचरित्राचा सखोल अभ्यास व लेखन करण्याची संधी प्राप्त झाली. त्याबद्दल मी त्यांचा सदैव ऋणी राहीन. लेखनातील त्रुटी या माझ्या आहेत. त्या आपण सर्वांनी सहन केल्या त्याबद्दल आपणा सर्वांना शतश: धन्यवाद व सप्रेम प्रणाम.

ही सर्व सेवा श्री स्वामी चरणी रुजु व्हावी ही प्रेमपुर्वक प्रार्थना.




हा अध्याय म्हणजे अवतरणिका. सगळ्या समग्र ग्रंथाचा शेवट व सारांश. श्री प्रविण व सौ शामलाताई कुळकर्णी यांचा हा एक वाग्यज्ञच जणू. साधारण पाच वर्षे सातत्याने चालू असलेली ही मालिका या अंकात समाप्त झाली. सगळ्याच चांगल्या गोष्टींचा शेवट हा नेहमीच मनाला चटका लावून जातो हे तर आपण नित्यच पाहतो. या सुंदर संकल्पाच्या पूर्तीच्या क्षणी ह्या कुळकर्णी दांपत्याबद्दल प्रत्येक साधकाच्या/वाचकाच्या मनात कृतज्ञता आणि आदर असणे स्वाभाविकच. आणि श्री गुरूचरित्र हे तर अमृतच. ह्या अमृताच्या पानाबद्दल समस्त वाचकांच्या आणि संपादकिय मंडळाच्या वतीने आम्ही कुळकर्णी दांपत्याचे आभार मानतो व श्री गुरू दत्ताने आणि श्री स्वामी समर्थांनी आपल्या आशिर्वादाचा वरद हस्त सातत्याने त्यांच्या माथ्यावर ठेवावा ही त्या दैवतांच्या चरणी प्रार्थना.

॥ अनंत कोटी ब्रह्मांड नायक राजाधिराज योगीराज सच्चिदानंद सदगुरु श्री स्वामी समर्थ महाराज की जय ॥

॥ अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त ॥

॥जय गुरुदेव॥



मुक्तांगण

# स्थित्यंतर...

**कल्पिता कीर**

ब्रम्हा, विष्णू आणि महेश, सृष्टीचे कर्ता–धर्ता. ब्रम्हा नवनिर्माण करणारे, विष्णू नियोजन करणारे तर महेश लय करणारे. हे कितीतरी वेळा आपल्या वाचनात आले आहे. ब्रम्हा आणि विष्णूचे कार्य तर आपल्याला बऱ्याच वेळा उमगतेही पण महेशाचे कार्य आपल्याला बऱ्याच वेळा लक्षातच येत नाही. खरेतर ह्या तिघांची कामे वेगवेगळी भासली तरी ती एकमेकांत गुंफलेली आहेत. निर्मिती–नियोजन–लय... हे खर तर एक पूर्ण वर्तुळ आहे. आपण लय या प्रक्रियेला घाबरतो पण लय झाल्याशिवाय नवनिर्माण कसे होणार?

आज जेव्हा आपण बातम्या वाचत आहोत की नदिचा तळ दिसू लागला आहे, दूरवरच्या पर्वतरांगा, ज्या आधी दिसत नव्हत्या (प्रदुषणामुळे), त्या स्पष्टपणे दिसू लागल्या आहेत, पशू–पक्षी मुक्तपणे विहार करत आहेत. तेव्हा जाणवतं आहे की अरे हे तर स्थित्यंतर आहे. आणि स्थित्यंतर तेव्हाच सुरु होते जेव्हा आपल्याला जाणीव होते की आपण कुठे आहोत आणि आपल्याला कुठे जायचे आहे. इथे एका विरामाची (Pause) गरज असते.

पण कदाचित आपण मनुष्य सुखाच्या वेडया कल्पनेने इतके भारावले होतो की न थांबता नुसते त्यांच्यामागे धावत होतो. आपला वेग कमी होण्याची चिन्हेच दिसत नव्हती. मग हा विराम आपल्याला देण्यासाठी देवाला परिस्थिती तयार करावी लागली. आणि जेव्हा बाह्यक्रिया थांबविल्या गेल्या तेव्हा आंतरिक प्रवास सुरु झाला.... सृष्टीतील प्रत्येक जीवाचा. त्याचा परिणाम म्हणून निसर्ग परत टवटवीत भासू लागला, नद्या परत निखळपणे वाहू लागल्या, मनुष्य जो कुटुंबापासून दूर गेला होता परत कुटुंबाजवळ आला. छोट्या छोट्या गोष्टीतून मिळणारा आनंद परत नव्याने अनुभवू लागला. आपल्या आत दडवून टाकलेल्या कलांना मुक्त करू लागला. ह्यातूनच अनेक कविता, लेख, गाणी, चित्रकला घडू लागली. प्रतेकाला स्वत:ची नव्याने ओळख होऊ लागली.

ह्या सगळ्या परिस्थितीत साधकाची साधनाही त्याच्यात स्थित्यंतर घडवू पहात आहे. नुकतीच सोशल मिडीया मध्ये ऐक सुंदर कविता व्हायरल झाली- 'पंढरीची वारी'. ऐका वारकऱ्याने विठूला घातलेली साद आणि त्यावर विठूने दिलेले समर्पक उत्तर. पंढरीच्या वारीच्या आठवणीने व्याकूळ झालेला वारकरी. टाळ, मृदुंग, वीणा, चिपळ्या, कपाळीचा टिळा, तुळशी माळा, ती पंढरीची वाट, चंद्रभागेचा काठ कुठेतरी हरवतो आहे असे त्याला वाटत आहे. खरेतर पंढरपूरला जाणारा वारकरी असो शिर्डी–अक्कलकोटच्या वाऱ्या करणारा भक्त असो किंवा आपल्या गुरुंच्या आश्रमात नियमित सेवेला जाणारा साधक असो, सगळ्यांची हीच स्थिती झाली आहे. आणि ह्या परिस्थितीतून बाहेर पडण्याचा मार्ग तो विठूला विचारत आहे. आणि विठू त्याला उत्तर देतो

ज्ञाना नाम्या तुका । कीर्तनी बोलला ।
विसरी का त्यांची । शिकवणी ।

वारी नोहे साध्य । ते साधन होत ।
अंतरीची ज्योत । जागी करा ।

थोडक्यात काय तो आपल्याला जाणीव करून देत आहे की ही सर्व भगवंताकडे पोहचवणारी साधने आहेत. हा सगुणाकडून निर्गुणाकडे नेणारा प्रवास आहे आणि म्हणून त्या साधनात जास्त न गुंतता आंतरिक प्रवासास सुरुवात करणे ही साधनेची पुढील पायरी आहे. आणि एकदा का आपण साधनेची ही पायरी चढलो, मानस पूजेच्या पातळीला पोहचलो की मग तो देवच तुमच्या दारी येऊन तुम्हांला दर्शन देईल हे निश्चित...

हेच देवाला अपेक्षित असलेले साधकाचे साधनेतील स्थित्यंतर असावे...

# गो-महिमा

## एक वैज्ञानिक सत्य



संकलक : धनंजय जोग (बंगळूर)

वेदकालीन ऋषी-मुनींनी विश्वाला प्रथमत: गोसेवेचे महत्व समजावून सांगितले. काही लोकांच्यानुसार 'हा गोसेवेचा पाठ अखिल जगाला सांगून आमच्या मनात ऋषींनी नाहक गाईबद्दल पूजनीय भाव जागृत केला. ही पशू-पूजा वैज्ञानिक नाही.' असे आहे. परंतु वास्तविक हा असा युक्तीवाद सपशेल चुकीचा आहे. आपण जसा आपल्या उपयुक्ततेच्या दृष्टीने विचार करतो,तसाच ऋषी-मुनींनी पण केला असणे स्वाभाविक आहे. याच दृष्टीने विचार करून त्यांनी असे प्रतिपादन केले की, 'हिंदुस्थानसाठी गोसेवा लाभदायक आहे व गोसेवा हा धर्म आहे.' त्यामुळे गोसेवा करीत करीत शक्य तेवढा गाईचा उपयोग करून आपण आपले जीवन सुखी केले पाहिजे. वेदामध्ये एक वचन आहे. "सहस्रधारा पयसा मही गौ:" अशी गाय की जी सहस्रधारांतून दूध देईल (ऋचा ४.३.१०). याचाच अर्थ वेदकाळातील गाय १००-१२५ लिटर पर्यंत दूध देत असली पाहिजे. या वरून ऋषी-मुनींची धारणा काय होती आणि गाईंपासून त्यांची कोणती अपेक्षा होती ते आपल्या ध्यानी येईल.

आजकाल गाईचे दूध मिळत नाही अशी लोकांची तक्रार असते. असेही ऐकू येते की गाईचे दूध थोडेबहुत कसेबसे मिळेल पण तुपासाठी म्हशीलाच शरण जावे लागेल. आमच्या प्राचीन वेदकालीन ऋषींना हे मान्य नाही. ते म्हणतात – 'यूयं गावो मेदयथा कृशं चित्' (ऋचा ६.४.१४) म्हणजे – हे गाईंनो, ज्याचे शरीर स्निग्ध पदार्थांवाचून सुकले आहे,अशक्त झाले आहे त्याला तुम्ही आपल्या मेदाने म्हणजे स्निग्धांशाने (ज्याला आपण फॅट म्हणतो) तजेलदार आणि धष्टपुष्ट करा. याचा मतिमार्थ असा– अशक्त आणि दुर्बल माणसाला धडधाकट आणि बलवान बनविण्यासाठी आवश्यक स्निग्धांश फॅटस गाईच्या दुधात मुबलक प्रमाणात उपलब्ध असायला हवेत. जर हल्ली गाईच्या दुधात त्यांचे प्रमाण कमी असेल तर ते (स्निग्धांश) वाढवण्यासाठी गाईच्या आहाराची योग्य ती काळजी घेऊन आम्ही प्रयत्न केले पाहिजेत.

स्निग्धांशांची कसर गाईत नाही आमच्या सेवेत व प्रयत्नांत आहे. या विचाराच्या पुष्टीदाखल ऋषींनी गाईअचे असे वर्णन केले आहे – "अश्रीरं चित् कृणुथा सुप्रतीकम्" (ऋचा ६.४.१४) म्हणजे, ज्याचे शरीर श्रीर आहे त्याचे असे शरिर गाय श्रीर बनवते. येथे श्रीर या शब्दाचा अर्थ शोभायमान असा आहे. म्हणजेच ऋषींना असे सुचवायचे आहे की सत्वहीन व कृश शरीरास गाईचे दूध बलिष्ट बनवते. यावरून आपल्या हे लक्षात येण्यास काहीच हरकत नाही की वेदकालीन ऋषी-मुनींनी गो-सेवेचा जो पहिला पाठ आपल्याला शिकवला आहे, त्यात गोसेवेची संगोपन-संवर्धनाची दिशाही दाखवून दिली आहे. ही दिशा अनुचित पूजा भावाची नाही तर शुध्द वैज्ञानिकतेची आहे जी आम्हांला गोसेवेत निरंतर मार्गदर्शन करीत राहील.

# स्वामी विवेकानंद आणि ध्यान



लेखांक ५ वा

लेखक: श्री प्रांजल जोशी, पुणे

## सावध रहा !

कारण म्हणजे तलावाच्या पृष्ठभागावर सातत्याने येणारे त्याच तलावाच्या पाण्याचे तरंग वा लाटा. परंतु हे तरंग जेव्हा कमी होतील आणि पाणी शांत होईल तेव्हा मात्र आपल्याला तलावाचा तळ दिसू शकेल. हा! पण जर पाणी देखील गढूळ नसेल तरच. म्हणजेच जर पाणी शुध्द असेल आणि त्यात तरंग उमटत नसतील तर मात्र आपण नक्कीच तलावाचा तळ पाहू शकू.

हा तलावाचा तळ म्हणजेच आपले खरे स्वरूप, तलाव म्हणजे आपले चित्त आणि त्यात उमटणाऱ्या लाटा वा तरंग म्हणजे वृत्ति (विचार-लाटा). या वृत्ति तीन प्रकारच्या आहेत, त्यापैकी पहिली आहे अज्ञान वा अंधकारमय, ज्याला "तम किंवा तामस" असे म्हणतात, हि पशुसमान आणि मूर्ख-वृत्ती आहे. हि वृत्ती फक्त अहित साधू शकते. इजा वा अपाय करणे, या व्यतिरिक्त इतर कोणताच विचार या अवस्थेत नसतो. दुसरा प्रकार म्हणजे राजस वृत्ती. सक्रिय मनाची अवस्था, ज्याचा मुख्य हेतू सत्ता- अधिकार मिळवणे, चैन करणे आणि उपभोग घेणे एवढयापर्यंतच सीमित आहे. "मी सामर्थ्यवान होईन आणि इतरांवर अधिकार गाजवेन" असाच विचार राजस वृत्ती करते. आता तिसरी अवस्था आहे 'सात्विक'. जी निर्मळ, शांत आणि प्रसन्नतेची अवस्था आहे. हीच ती अवस्था ज्यामध्ये लाटा थांबतात आणि मनाच्या तलावाचे पाणी शुध्द (स्पष्ट) होते. जणू मानस सरोवर !

## मनाचे नियमन

ध्यान करणे हे मनामध्ये सातत्याने उठणाऱ्या विचार लहरींचे (वा लाटांचे) नियमन करण्यासाठीचे एक सर्वोत्कृष्ट साधन आहे. ध्यान केल्याने या मनोलहरी वश येतात, नियंत्रित होतात. आणि जर तुम्ही सातत्याने दररोज, वर्षानुवर्षे ध्यानाचा सराव कराल, ज्याने ध्यान करणे ही तुमची स्वाभाविक सवय वा परिपाठच बनून जाईल, तेव्हा आपोआपच राग आणि द्वेष नियंत्रणात येतील आणि तुमची वृत्ती संयमित होईल.

## आनंदी रहा

आपण अध्यात्मिक होत असल्याचा पहिला संकेत म्हणजे आपण आनंदी होतो. धीरगंभीर किंवा खिन्न चेहरा हे काही अध्यात्मिकतेचे लक्षण नाही. एखाद्याला फारतर अपचन झाल्यावर असे हावभाव तो चेहऱ्यावर दाखवेल, अध्यात्मिक झाल्यावर नक्कीच नाही.

खऱ्या अध्यात्मिक माणसाला चहूकडे आनंदच दिसतो. त्याच्यासमोर येणारा प्रत्येक चेहरा आणि प्रत्येक व्यक्ती त्याला आनंदच देतो. खिन्न, उदास किंवा धीरगंभीर भाव तो का व्यक्त करेल? ज्यादिवशी, तुम्ही उदास, दुःखी, खिन्न किंवा गंभीर असे असाल त्यादिवशी घरीच बसा. कोठेही बाहेर जाऊ नका. कारण चेहऱ्यावर असले भाव आणून हा खिन्नतेचा अन उदासीनतेचा रोग बाहेर कशाला नेता? तो अधिकार तुम्हाला कोणी दिला?

(क्रमशः)



जाहल्या स्वामीराज वैद्य, व्याधी पळे आपणची...

# श्रीधर ब्राह्मणाचा पोटशूळ बरा झाला.

कर्नाटकातील श्रीधर नावाचा एक ब्राह्मण पोटशूळाने जर्जर होऊन गाणगापुरास आला व श्रींच्या सेवेत राहीला. एके रात्री त्याला असा स्वप्न दृष्टांत झाला कि प्रत्यक्ष दत्त महाराजांनी यतिरूप धारण करून त्याला आज्ञा केली कि श्रीपुरीचे पानांचा रस काढून त्यात सुंठ व सैंधव घालून भक्षण कर म्हणजे तुझा पोटशूळ शांत होईल. सकाळी जाग आल्यावर त्याला ते स्वप्न आठवले परंतु श्रीपुरीचे झाड म्हणजे नेमके कसले झाड याचा त्याला बोध होईना. त्याने बऱ्याच वैद्यांना व काही अनुभवी गृहस्थांस हे विचारले परंतु कोणीच त्याला त्या झाडाबद्दल काहीच सांगेना. तो ब्राह्मण बिचारा सचिंत होऊन दुसरे दिवशी देवळात झोपला असताना त्याला पुन्हा श्रींनी दृष्टांत दिला कि अक्कलकोटास परमहंसस्वामी आहेत ते तुला श्रीपुरीचे झाड दाखवून देतील.

तो त्या सकाळीच अक्कलकोटाच्या दिशेने निघाला व दुसरे दिवशी अक्कलकोटास जाऊन पोहोचला. त्यावेळी समर्थांची स्वारी नव्या विहीरीवर मारूतीच्या ओट्यावर बसली होती. श्री स्वामींच्या पायावर डोके ठेवून तो तेथेच उभा राहीला. त्याचे तोंडाकडे पाहूनच महाराज म्हणाले, अरे निंबाचे झाडास श्रीपुरी म्हणतात. त्याचा रस काढून त्यात सुंठ व सैंधव मिश्रण करून तीन दिवस घे म्हणजे तुझी व्याधी नष्ट होईल.

ब्राह्मणास आनंद झाला व स्वामी आज्ञेप्रमाणे औषध घेतल्यावर आठ दिवसांनी तो बरा होऊन श्री स्वामींचे गुणानुवाद गात आपल्या गावास परत गेला.

(संदर्भः अक्कलकोटनिवासी स्वामी समर्थ महाराज चरित्र, लेखकः कै गणेश बल्लाळ मुळेकर, पृष्ठ १७)



(भाग ३२वा)

# तेलंग स्वामी

## एक अद्भुत अस्तित्व

अनुवादक – सौ. शुभदा गर्गे, नाशिक

काशीमध्ये फार पूर्वीपासून ऋषी–मुनींचे वास्तव्य आहे. अजुनही बरेचसे संत गुप्तपणे येथे राहतात. ज्या संतांचे मठ, आश्रम आहेत ते सर्वश्रुत आहेत.

काशी ही तीच नगरी आहे जेथे महर्षि वेदव्यास येऊन राहिले. शास्त्रार्थकरिता पतंजलिही येथेच आले होते. गौतमांनी बुध्द झाल्यावर आपला पहिला उपदेश येथेच दिला. येथील एका चांडालाने शास्त्रार्थात जगद्‌गुरु शंकराचार्यांचा पराभव केला होता. जाति–पाति पूछे नहीं कोई, हरि को भजै सो हरि का होई या तत्वाची घोषणा रामानंदानी येथेच केली. कबीरांचे उपदेश येथूनच सर्वत्र पसरले. तुलसीदासांनी आपली हृदयस्पर्शी भजनेही येथेच गायली. श्री वल्लभाचार्यांची महति येथेच गायली गेली तर चैतन्यप्रभूंनी येथील एका भागास आपले नाव बहाल केले. तो चैतन्य वड आज जतनबर म्हणून प्रसिध्द आहे. अशा प्रकारे प्रत्येक संप्रदायाच्या संतांचे पाय या भूमीला लागले. ह्यातील बहुतांश लोकांचे येथे मठ, आश्रम आहेत; परंतु तेलंग स्वामींनी भरमसाठ शिष्य नाही केले. त्यांचे शिष्य मोजकेच होते.

तेलंग स्वामींच्या शिष्यांबद्दल श्री उमाचरण मुखोपाध्यांनी लिहिले आहे की त्यांचे केवळ चार शिष्य होते व ते पाचवे. श्री उमाचरण यांचे हे म्हणणे बरोबर नाही. एकतर त्यांनी नीट माहिती काढली नसेल नाहीतर त्यांना चुकीची माहिती मिळाली असेल. स्वामीजींचे वीस शिष्य होते असे कळते. सर्वश्री कालीचरण सरस्वती, स्वामी ब्रम्हानंद सरस्वती, स्वामी भोलानंद, स्वामी सदानंद, त्रिपुरलिंग,सच्चिदानंद सत्यानंद, नरसिंहानंद, कन्हैयालाल, मंगलदास भट्ट (यांचे दोन भाऊ), महादेव भट्ट, श्रीकृष्ण भट्ट, माँ अंबादेवी, श्रीराम भट्ट, योगेश्वरी माता, राजलक्ष्मी माता, शंकरी माता, केदारनाथ बॅनर्जी, रामतारण भट्टाचार्य आणि उमाचरण मुखोपाध्याय. जर सामान्यत: प्रभुपाद विजयकृष्ण गोस्वामी पण धरले तर २१ होतात.

गृहस्थ शिष्यांमध्ये उमाचरण शेवटचे होते. जांचे जीवनकार्य बघून तेलंग स्वामींचे अनेक भक्त तयार झाले. उमाचरणजी मुंगेर शहरातील एका औषधांच्या कंपनीत कामाला होते. तेलंग स्वामींचे नाव ऐकून ते काशीला आले होते. त्यांनी स्वामींचे शिष्य होण्याकरिता काय अडचणी आल्या ते त्यांनी त्यांच्या पुस्तकात लिहिले आहे. मुंगेरच्या एका शाळेत बाबू सुरनाथ चटोपाध्याय हे प्राध्यापक होते. ते काशीचे होते व नारद घाटावर त्यांचे स्व:ताचे घर होते. या घराची देखरेख रामचन्द्र मुखर्जी करीत असत. सुरनाथांकडून त्यांच्या नावे एक पत्र घेऊन उमाचरणजी तेथे राहू लागले. घरमालकाचे पाहूणे, त्यात बंगाली, ह्या कारणाने त्यांना अनेक सोयी प्राप्त झाल्या. सुरनाथांनी त्यांना अनेक मंदिरेही दाखवली. मध्येच एकदा मुखर्जी पंचगंगा घाटावर तेलंग स्वामींच्या दर्शनाला जाऊन आले.

बोलता–बोलता मुखर्जींनी तेलंग स्वामींबद्दल चौकशी केली. सुरनाथ म्हणाले, त्यांच्याबद्दल काही विचारू नका. खूप विचित्र व वेडा आहे तो माणूस. जात–पात मानत नाही, खाण्या–पिण्याची शुध्द नसते. कोणाशीही बोलत नाही. नेहमी नंगा पडून असतो. गर्मीत तापल्या वाळूवर झोपतो व थंडीत गंगेत डुबक्या मारतो. असेही म्हणतात की दोन–दोन दिवस पाण्याखालीच राहतात. कधी प्रेतासारखे पाण्यावर तरंगतात. लोक त्यांना कुंभक योगी म्हणतात. माझ्या मते त्यांचे वय सातशे–आठशे असेल.

दुसऱ्या दिवशी स्नान झाल्यावर उमाचरण सरळ तेलंग स्वामींच्या आश्रमात गेले. त्यांना प्रणाम करून एका खांबाला टेकून उभे राहिले. उमाचरणांना अनेक प्रश्न विचारायचे होते, विशेषत: पुनर्जन्माबद्दल. पण जवळ जाऊन विचारण्याची हिम्मत येत नव्हती.

ते असे उभे असतानाच त्यांना परत जाण्यास सांगण्यात आले. त्यांनी थोडा वेळ थांबू द्यावे अशी विनंती केली असता मंगलदास भट्टांनी त्यांना त्वरीत निघून जाण्यास सांगितले. अत्यंत दु:खी मनाने ते परत आले. परंतु संध्याकाळी परत जाण्याचा निश्चय करूनच.

संध्याकाळी परत जाऊन नमस्कार करून खांबाला टेकून उभे राहिले. थोड्या वेळाने ते अगदी प्रश्न विचारणार एवढ्यात स्वामीजींनी सकाळप्रमाणेच हाताच्या ईशाऱ्याने त्यांना बाहेर पाठवण्यास सांगितले. प्रश्न तसाच राहिला. उदास मनाने ते परत फिरले.

दुसऱ्या दिवशी सकाळी पुन्हा उमाचरणजी नमस्कार करून खांबाजवळ उभे राहिले. पुन्हा हाताच्या ईशाऱ्याने जाण्यास सांगितले. तरीही उमाचरण उभेच राहिले. मंगलदास म्हणाले, “तुम्ही निघा.” तरी उमाचरण जाईनात तेव्हा स्वामीजींनी एका गवळ्याला इशारा केला. गवळ्याने धक्के मारून त्यांना बाहेर काढले. अपमानित होऊन रडतच ते घरी गेले.

दिवसभर उमाचरण सकाळच्या घटनेचाच विचार करत होते. शेवटी त्यांनी निर्णय घेतला की परत जायचेच. त्यांनी विचार केला की जे नशीबात आहे ते होणारच, पण मी माझ्या प्रश्नाचे उत्तर घेतल्याशिवाय स्वामीजींना सोडणार नाही. संध्याकाळी उमाचरण पुन्हा गेले. नेहमीसारखे नमस्कार करून खांबाला टेकून उभे राहिले व त्यांना जाण्यास सांगण्यात आले.

क्रमश:

## चैतन्याचे धुमारे



# अंगाई गीत

उमा कर्नाटकी

ये ग कलिके, ये ग लतिके, जोजवा छकुल्यांना ।
अंगाई गाते मी तुम्हांला बाळांनो, जो जो रे बाळा जो ॥धृ॥

निजली गाऊली, निजली चिऊली । रात्रीच्या समयाला ।
तुम्हां जोजविता थकली माऊली, लागेना परी डोळा ।
विसावा घ्या रे लाडक्यांनो आता मिटून पापणीला ॥१॥

पालख तुमच्या जगावेगळा, पानाफुलांनी पहा सजला ।
माया ब्रम्हाच्या नामकरणाला, जमला सारा मेळा ।
शरद, श्रुतिकेची बालके हासता, सुगंध दरवळला ॥२॥

देवकीचा हा गोड कान्हुला, संगे भगिनीला घेऊनी आला ।
कवाड, अंगण हर्षले मानसी, पाहता भगवंत लीला ।
व्हा रे भाग्यवंत, यशवंत, जयवंत, आशीष माझा भला ॥३॥

# भय आणि कवच

(संकलक : सौ सविता कर्णिक)

मूळ लेखक : कै श्री नागेश करंबेळकर

परम अर्थाचे ३६५ दिवस ह्या पुस्तकातून घेतलेले हे टिपण रेकिब्रह्माच्या वाचक खासच आवडेल.

महाराजांचे नामस्मरण करणाऱ्यास त्यांच्या नामशक्तीने अभय कवच मिळते. कोणत्याही संकटातून निभावून जाण्याची शक्ती मिळते व धीर मिळतो. जो प्रपंच आणि परमार्थ यशस्वीरित्या पार पाडत असतो त्यास मातब्बर म्हटले आहे. अशा मातब्बर जीवावर देवाचा आणि गुरूचा विशेष अनुग्रह होतो. हे जरी खरे असले तरी प्रपंच वा परमार्थात कधीतरी, कोठेतरी विघ्न उभे राहतेच. त्याचा मुकाबला तो मातब्बर जीव धीराने करू शकतो. याचे कारण परमार्थातील श्रद्धेने केलेल्या वाटचालीने त्याला आलेला आत्मविश्वास होय. अशा जीवापाठी देव आणि गुरू ठामपणाने उभे असतात.

आपल्यात षडरिपुही असतात. ह्या षडरिपूंपैकी “मद” हा हत्तीसारखा प्रचंड विकार आहे. हा कधी, कोठे कसा कोणत्या कारणाने उधळेल ते सांगता येत नाही. त्याच्या थैमानामुळे वृत्ती, भाव-भावना, संकल्प-विकल्प यांच्यात प्रचंड घबराट होते आणि अनर्थ कोसळण्याची भीति निर्माण होते. अशावेळी देव व गुरू जीवाला पूर्व संकेताने सावध करतात. तेव्हा जीवाने शांत मन ठेवून उपासनेची तीव्रता वाढवल्यास हा माजलेला मद, शांत होतो. श्री स्वामींचे आरोग्य कवच नित्य वाचनात ठेवल्यास षडविकारांचे भय उरत नाही.

**अनंत कोटी ब्रह्मांड नायक**
**राजाधिराज योगिराज**
**सच्चिदानंद सदगुरु**
**श्री स्वामी समर्थ महाराज की जय**
**अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त॥**



## ते कवच असे:

न चित कधीही चळो, नच कधी निराशा कळो ।
“समर्थ जय जय समर्थ” म्हणता सद्गुक्ती मिळो ॥

विशुध्द मन राहू दे सतत या उभ्या जीवनी ।
“समर्थ जय जय समर्थ” जप हा वसो तनुमनी ॥

न रोगव्याधी जडो, नच पिशाच्च बाधा जडो।
न घात अपघात हो सकल दुर्मतीही झडो ॥

किती जडविल्या मना विषय वासना अंत ना ।
“समर्थ जय जय समर्थ” म्हणता उरे अल्प ना ॥

उठे भडकूनी, झणी मन्मनी, क्रोध ज्वाळेपरी अल्प ना ।
“समर्थ जय जय समर्थ” म्हणता बुझे अंतरी ॥

मदांध गज हा जसा फिरतसे तसा हिंडतो ।
“समर्थ जय जय समर्थ” म्हणता सरळ चालतो ॥

सदैव् मी आंधळा, मजसी मोह ग्रासे पुरा ।
“समर्थ जय जय समर्थ” म्हणता निरासे पुरा ॥

तुडुंब मन हे भरे मत्सरे विनाकारणे,
“समर्थ जय जय समर्थ” म्हणता, पडे त्या उणे ॥

सुटे नच तुटे कधी सतत वाढता लोभ हा ।
“समर्थ जय जय समर्थ” म्हणता विरे हा पहा ॥

असे षडरिपु मला छळती पोळती अंतरी ।
“समर्थ जय जय समर्थ” म्हणता शमती सत्वरी ॥



रेकि शिबिरातील बोधकथा (४३)

# अशी ही प्रारब्धाची कथा

एकदा भगवान महादेव देवी पार्वतींसोबत आकाशात विहार करत होते. पार्वतीचे लक्ष्य पृथ्वीवर चाललेल्या घटनांकडे सातत्याने होते. त्यांना एका ठिकाणी एक गरीब माणूस दिसला. त्याला पाहून त्यांना खूप दया आली आणि त्या भगवान देवांना म्हणाल्या "मला ना त्या माणसाची फारच दया येते आहे. त्याच्यावर तुम्ही काहीतरी कृपा करा ना !" भगवान महादेव हसून म्हणाले, "अग, त्याच्या प्रारब्धात असे गरीब राहणेच आहे ह्या जन्मात. त्यामुळे आपण त्याच्यावर कशी कृपा करणार?" पार्वतीदेवींनी हट्टच धरला व म्हणाल्या, "असे काय करता? देऊन पहा त्याला वर" भगवान शिव म्हणाले, "बरे, काय करू मी?" देवी म्हणाल्या, "त्याला ना त्याच्या वाटेवर काही मोहरा टाका. मग तो त्या सहजतेने उचलेल. त्याची गरीबी दूर होईल."

महादेवांनी त्याच्या वाटेवर काही मोहरा टाकल्या. तो माणुस रस्त्याने चालत होता त्याच्या उजव्या बाजूलाच मोहरांचा तो ढीग होता. परंतु त्या माणसाला तो आपल्या धुंदीत असता तो काही दिसला नाही. तो तसाच पुढे गेला. महादेवांनी ते पार्वतीदेवींना दाखविले आणि म्हणाले, "बघ, मी सांगत होतो ना, त्याच्या प्रारब्धातच नाही तर तो तरी काय करणार?" पार्वतीदेवी म्हणाल्या, "हे काही बरोबर नाही. तुम्ही त्याच्या उजव्या बाजूला लांबवर मोहरा ठेवल्या. त्याला दिसल्या नाहीत. त्याला तो आणि त्याचे प्रारब्ध कसे काय जबाबदार? तुम्ही अगदी नजरेसमोर मोहरा ठेवा. मग बघा." भगवान महादेव पुन्हा हसून म्हणाले, "तसेच करूया." आणि त्यांनी मोहरा अगदी त्याच्या वाटेवर समोरच ठेवल्या जेथे तो माणुस आता वळणार होता. तेवढ्यात त्या माणसाला मनात आले कि अंध माणसे कसे काय बरे जगत असतील? रस्त्यावरून कसे काय चालत असतील? आपण ते अनुभवूया असे मनातल्या मनात म्हणून त्याने डोळे मिटले व चालायला लागला. नेमके जेव्हा त्या मोहरांसमोर तो आला त्यावेळेला त्याचे डोळे बंद होते. झाले, पुन्हा त्याला संधी हुकली. पार्वतीदेवी अगदीच हट्टाला पेटल्या. म्हणाल्या, "हेही बरोबर नव्हते. त्याला आंधळ्या लोकांची दया आली आणि त्यांच्या अवस्थेचा अनुभव करण्यासाठी त्याने डोळे बंद केले ह्यात त्याचा काय दोष? तुम्ही अगदी त्याच्या पायाजवळ जर मोहरा ठेवल्या असत्या तर डोळे बंद असूनही त्याला त्या मोहरांची ठोकर लागली असती. आता तसे करून पहा."

भगवान महादेवांनी आता मात्र अगदी त्याच्या पायाजवळ ठेवल्या. म्हणजे आणखी एक पाऊल आणि त्याला त्या मोहरांची जाणिव होणार. नेमके त्या माणसाच्या मनातील आंधळ्या माणसांची व्यथा दूर झाली नव्हती. त्याला आता वाटले कि आपल्या हे कळले कि त्याला कसे चालता येते. पण समोर जर एखादा मातीचा ढीग आला तर तो काय करत असेल. तेही आपण करून पाहू. असे म्हणून त्याने चक्क त्या मोहरांच्या ढिगावरूनही उडी मारली. त्या गडबडीत जेव्हा त्याने डोळे उघडले त्याला मोहरा दिसल्या नाहीत कारण त्या त्याच्या मागे गेल्या होत्या. हे पाहून पार्वतीदेवीने महादेवांना म्हटले, "भगवान तुम्हीच बरोबर होतात. त्याला एवढ्या वेळा संधी मिळुनही त्याला त्यातील एकाही संधिचा लाभ घेता आला नाही. शेवटी प्रारब्धाचाच खेळ."

**तात्पर्य:**

प्रारब्धात जेवढे लिहीले असेल तेवढेच माणसाला मिळते. परमेश्वराने किंवा गुरूंनी कितीही वरदान दिले तरीही एकतर त्याच्याकडे लक्ष जात नाही किंवा अहंकाराने आंधळेपण आले कि समोर असूनही ते दिसत नाही.

# आश्रम वार्ता

## (१) लॉकडाऊन मधील शिक्षण वर्ग:

गेल्या महिन्यात आपण पाहिले होते कि लॉकडाऊन हा जरी सामान्य माणसाच्या दृष्टीने एक कंटाळवाणा काळ असला तरीही आपल्या साधकांनी मात्र प्रत्येक दिवस अगदी रेकि शिबिर किंवा ध्यान शिबिर असल्यासारखा घालवला. एप्रिल आणि मे प्रमाणेच जून महिना असाच धमाक्याचा गेला. “रे ऑफ होप (आशेचा किरण)” हा आपला झूमवरचा कार्यक्रम तर अजूनही लोकांच्या चर्चेचा विषय बनून राहीला आहे. दर सोमवारी होणारा जर्मन वैज्ञानिक डॉ. उलरिच बर्क यांचा अग्निहोत्राचा वर्ग, बुधवारचा रसाळ भाषेतील उत्स्फूर्त असा होणारा राज सिन्नरकरांचा योग वर्ग आणि शुक्रवारचा रेकि वर्ग हे सगळे पर्वणीचे दिवस मानायला हरकत नाही. दर गुरूवारी होणारा गुरूजींचा “श्री गुरूचरित्र अभ्यास वर्ग” हाही आता हळूहळू वेग धरू लागला आहे. आणि त्यातच रेकि विद्या निकेतनने केलेला पहिल्या श्रेणीच्या विद्यार्थ्यांसाठीचा “सराव वर्ग सप्ताह” हा तर ह्या महिन्याचा चरम किंवा उच्च बिंदू मानायला हरकत नाही. हिंदी आणि इंग्रजीमध्ये घेतलेल्या ह्या वर्गांनी साधकांच्या पहिल्या शिबिरांच्या आठवणी जागृत झाल्या असल्यास आश्चर्य वाटायला नको.







## (२) अग्निहोत्रावरील आंतर्राष्ट्रीय चर्चासत्र:

रेकि विद्या निकेतनने पुढाकार घेऊन १२ जून ते १५ जूनच्या दरम्यान एक आगळा वेगळा असा प्रकल्प रचला तो म्हणजे अग्निहोत्रावरील आंतर्राष्ट्रीय चर्चासत्र. जर्मनी, अमेरिका, पोलंड, ऑस्ट्रेलिया, पेरू इत्यादि देशांतील ११ वैज्ञानिकांनी यात भाग घेऊन अग्निहोत्र प्रसाराला मोठीच चालना दिली. या चर्चासत्रात अग्निहोत्राचे वेगवेगळे पैलू आणि त्यांचा मानवी जीवनाच्या उत्थानासाठी होणारा उपयोग या गोष्टींचा समग्रपणे उहापोह केला गेला. विश्वशांतिच्या दिशेने टाकलेले हे मोठेच पाऊल म्हणायला हरकत नसावी.



## (३) अमेरिकेत होऊ घातलेले बालक आणि युवा शिबिर:

एप्रिल आणि मे २०२० मधील सहा "ऑन–लाईन" शिबिरांच्या यशानंतर देवरूख स्पिरीट्युअल प्रॉवेस प्रा. लि. या संस्थेने आता अमेरिकेच्या आकाशात झेप घेण्याला सुरूवात केली आहे. गेल्या वर्षीच्या न्यू जनरेशन डेव्हलपमेंट या अमेरिकेतील आपल्या साधकांच्या संस्थेच्या विद्यमाने भरवलेल्या शिबिराच्या यशाने आताची परिस्थिती लक्षात घेता ऑन–लाईन शिबिरे "मिडल पाथ १, २ व स्ट्रॉंग १" या गटांसाठी आयोजित करण्यात येत आहेत. २१ जूनला सुरू होणारी ही शिबिरे ३० जून पर्यंत चालतील.




## आश्रम स्पंदन



सध्या कोरोनाने सगळ्यांनाच घरी बंद करून ठेवले आहे. त्यामुळे आपण कोणीच आश्रमात जाऊ शकलो नाही. पण कोरोनाची मजल इथंपर्यंतच; कारण त्यापलीकडची उर्जा आहे ती गुरुतत्वाची ! जी कोरोनाच्या निमित्ताने सगळ्यांनाच स्व–तत्त्वाकडे घेऊन जात आहे. आपल्या लाडक्या लेकरांसाठी ती शक्ती घरा–घरात पोहचत आहे ती ऑन लाईन सेशनसद्वारे. या ऑनलाईन सेशनसद्वारे गुरुजींनी प्रत्येकाच्या हृदयात आश्रमातील सात्विक स्पंदन जागवली. ह्याबद्दल आपल्या लाडक्या गुरुजींचे, 'अजित सरांचे' खूप खूप धन्यवाद !

गुरुजींना व्हिडिओ माध्यमातून पहाताना, त्यांना प्रश्न विचारताना आपण आश्रमातील मैत्री रुममध्ये बसलो आहोत असे वाटते. श्री गुरुंनी 'गुरुचरित्राद्वारे' सगळ्या भक्तांचे कल्याण केले. गुरुचरित्रातील अनेक गुढार्थ सांगून गुरूजींनी आपल्या सगळ्यांचेच शुध्दीकरण केले. गुरु–महिमा हा तेव्हा पुरता मर्यादीत नसून तो आजही आपल्या भक्तांसाठी निरंतर कार्य करीत आहे. हे सगळ्यांनाच जाणवत आहे.

अशाच एका सेशनमध्ये आपली व्यथा सांगताना एक साधिकेने गुरुजींना विचारले की बाहेर जी स्थिती आहे ती बघता आपल्या हातात काहीच नाही का असे वाटते. त्यावर गुरुजी म्हणाले, "अगं असं का म्हणतेस? आपल्या हातात स्वामींचा हात आहे. आपण फक्त त्यांच्या हाताला पकडून टिकून रहायचे. स्वामी ज्यांचा हात धरतात तो हात कधीही सोडत नाहीत. तारकमंत्र आठव.. त्यातील शेवटची ओळ जी त्यांनी नेहमीच पूर्ण केली आहे.. **" न सोडती तया जया स्वामी घेती हाती."**

गुरुजींचे हे शब्द ऐकून प्रत्येक रोम–रोम स्पंदनांनी भारावून गेले.